उप अभियंता पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत- श्री. डी. बी. बेहरे, सहायक अभियंता, श्रेणी-२.

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

शासन आदेश क्र.जिपअ-२०१८/प्र.क्र.२२/आस्था-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दिनांक-९ मे,२०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सेवाजे १०९९/प्र.क्र.६/९९/१२, दि.८.३.१९९९.
२. ग्रामविकास विभाग पत्र क्र. एपीटी-१६०४/प्र.क्र.३१५/आस्था-७, दि.५.१.२००५.
३. ग्रामविकास विभाग पत्र क्र.झेडएनजी-१००५/प्र.क्र.१३६०/आस्था-४, दि.७.७.२००५.
४. ग्रामविकास विभाग पत्र क्र. सेवाजे-११०९/प्र.क्र.१६९/आस्था-१०, दि.२१.१२.२०१०.

आदेश- :

संदर्भ क्र. १ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयान्वये, जिल्हा परिषदांमधील १३७२ पदांवरील अनियमित नियुक्त्या ग्रामविकास विभागाच्या दि. २९ एप्रिल, १९९९ च्या शासन निर्णयान्वये नियमित करण्यात आल्या आहेत. सदर नियुक्त्या नियमित करतांना दि.१८.२.१९८८पूर्वीच्या तात्पूरत्या दिलेल्या अथवा रोजंदारीवर नियुक्त्या दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा देखील ८.३.१९९९ अन्वये नियमित करण्यात आल्या आहेत.

२. श्री.धर्मेंद्रकुमार ब.बेहरे, उपविभागीय अभियंता यांची जिल्हा परिषद, धुळे येथे कनिष्ठ अभियंता या पदावर दि.२१.५.१९९१ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. श्री.बेहरे यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे नियमित नियुक्तीसाठी दि.८.३.१९९९ हा दिनांक देण्यात आला होता.

३. श्री.बेहरे,उपविभागीय अभियंता, यांनी शासन सेवेत नियमित करण्याच्या अनुषंगाने प्रथम औद्योगिक न्यायालय, नाशिक येथे ULP No.२८५/९६ दाखल केली होती. सदर प्रकरणी मा. औद्योगिक न्यायालयाने दि. ५.९.१९९६ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार, नियुक्ती दिनांकापासून नियमितीकरणाचे फायदे देण्याबाबत निर्णय दिला आहे. त्यानुसार विभागाने संदर्भ क्र.२ अन्वये आदेश पारित केले. तथापि, औद्योगिक न्यायालयाच्या उपरोक्त आदेशास मा.उच्च न्यायालयाने (रिट याचिका क्र.२७२१/१९९७) स्थगिती दिली असल्याची बाब जिल्हा परिषद, धुळे यांनी शासनाच्या निदर्शनांस आणून न दिल्याने उक्त संदर्भ क्र. २ येथील आदेश पारित झाले. यामुळे विभागाकडून श्री.बेहरे यांच्या संदर्भात संदर्भ क्र.४ अन्वये सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले. त्यास श्री.बेहरे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे मुळ अर्ज क्र.४४/२०११ अन्वये आव्हानित केले होते.

४. दरम्यान, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रलंबित रिट याचिका क्र.२७२१/१९९१ शासनाने Withdraw केली. यास्तव मा.न्यायाधिकरणाने, उपरोक्त मुळ अर्ज क्र.४४/२०११ दि.२४.६.२०११ रोजी निकाली काढतांना पुढीलप्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत-

"In View of the withdrawal of the W.P. the interim relief granted does not survive beyond the date of withdrawal i.e.१९.३.२०१०. Therefore, on २१.१२.२०१० the stay was not in the field. On the Contrary, it was the relief granted by Industrial Court in favor of the applicant was in the field. The order under challenge is therefore, not sustainable."

मा. न्यायाधिकरणाच्या उपरोक्त निर्णयानुसार मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे पुनर्विलोकन याचिका क्र. २४०७/२०१३ दाखल केली होती. तथापि, सदरहू याचिका देखील दि.०३.०३.२०१४ रोजी फेटाळण्यात आली आहे.

५. उपरोक्त वस्तुस्थिती नुसार मा.न्यायालयाने दिलेले न्यायनिर्णय पाहता श्री.बेहरे यांनी कनिष्ठ अभियंता या पदावर दि.२१.०५.१९९१ या दिनांकास म्हणजेच प्रथम नियुक्ती दिनांकापासून सेवा ज्येष्ठता देण्यात येत आहे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक२०१८०५०९१३१४४४००२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Ramesh Shinde

Digitally signed by Vivek Ramesh Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=98222e73b61528cee875e0cab75e02437703c365921479fb0198fcf43d79d224, serialNumber=3d2f2d59501068679dd214122d63cb4d2d18b76f5a89cae6eca0162ae6701444, cn=Vivek Ramesh Shinde
Date: 2018.05.09 14:23:50 +05'30'

(वि.र.शिंदे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) ,बांधकाम भवन,फोर्ट, मुंबई.
२) सचिव (जसंव्य/लाक्षेवि.)जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) उपायुक्त (आस्था.) विभागीय आयुक्त नाशिक यांचे कार्यालय.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,धुळे.
५) श्री.ध.ब.बेहरे, उप विभागीय अभियंता, गिरणा पाटबंधारे उप विभाग,चाळीसगाव.
६) निवड नस्ती (आस्था-४).